## प्रेसनोट दि २०/९/२०१८

# अवैध्यरीत्या पिस्टल बाळगणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगारासह एकास दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडून अटक

## एक देशी बनावटीचे पिस्टल व ४ जिवंत काडतुस जप्त करण्यात आली.

आज दिनांक १८/०९/२०१८ रोजी दरोडा प्रतिबंध पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवा दरम्यान गुन्ह्यांना आळा करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार राहुल नितनवरे, रा हडपसर, पुणे हा गुरुनानक नगर, रोहीदास गार्डन कासेवाडी भवानी पेठ पुणे या ठिकाणी येणार आहे. त्याच्याकडे एक पिस्टल आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, दरोडा प्रतिबंधक पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना कळविले त्यांनी कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश केलेने पोलीस स्टाफसह त्यांस पकडुन त्यांची झडती घेतली असता त्याने त्याच्या कमरेला पॅटमध्ये खोचलेले एक गावठी बनावटीचे पिस्टल व त्याचे खिशात चार जिवंत काडतुसे मिळुन आले त्यांचेकडे शस्त्र परवाना आहे अगर कसे बाबत विचारपुस करता त्याने सांगीतले की, माझ्याकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नाही. सदरचे शस्त्र माझा मित्र संदिप मछिंद्र चांदने, रा.रायगड कॅालनी, गंगानगर, फुरसुंगी, पुणे याने एक महिन्यापुर्वी ठेवायला दिल्यांचे सांगीतले. संदिप मछिंद्र चांदने यास स्वारगेट परिसरात स्वारगेट डेपो समोर रोड वरून ताब्यात घेण्यात आले.त्याचेकडे चौकशी केली असता मिळून आलेले पिस्टल हे त्याचेच असून त्यानेच राहुल नितनवरे याचेकडे ठेवण्यासाठी दिल्याचे कबूल केल्याने सदर दोन्ही आरोपी विरूध्द खडक पो.स्टे येथे गुरनं ३०९/२०१८ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. राहुल नितनवरे या आरोपीवर यापुर्वी एक खुनाचा गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम,महीला स.पो.निरीक्षक विद्युलता चव्हाण,पोलीस कर्मचारी शंकर पाटील,रामदास गोणते,अजय थोरात,अमोल पवार,विल्सन डिसोझा,सचिन गायकवाड ,वैभव स्वामी यांनी केली.